महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवाचे
चित्रपती कै. व्ही. शांताराम यांच्या नावाने,
पुरस्कार देण्याबाबतच्या कार्यनियमावलीस
मंजूरी देणेबाबत....

---

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्र. मचिम १०९३/१५११९/प्र. १५९/सांका-१.
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.
दिनांक: २८ ऑक्टोबर, १९९३.

वाचा:- १] संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रमांक:
सांकास/महो/मचिम/९३/७७६०, दि. ६. ८. ९३.
२] शासकीय पत्र समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्र. मचिम १०९३/१५११९/प्र. १५९/सांका-१, दि. २३. ७. १९९३.

<u>शासन निर्णय</u>:- चित्रपती "कै. व्ही. शांताराम, यांच्या नांवाने प्रतिवर्षी मराठी चित्रपट क्षेत्रात उत्कर्षासाठी ज्यांनी दीर्घकाळ आपले आयुष्य घालविले आहे व त्या क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी केली आहे अशा व्यक्तिस रु. १.०० लाख रोख रक्कम "कै. व्ही. शांताराम पुरस्कार" म्हणून देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. विचारांती "कै. व्ही. शांताराम पुरस्कार" देण्यास व या पुरस्कारासाठी रोख रक्कम रु. १, ००, ०००/- [रूपये एक लाख]फक्त] पुरस्कार दरसाल अेका प्राप्त व्यक्तीस देण्यास शासन या शासन निर्णयान्वये मंजूरी देत आहे. त्याचप्रमाणे सदर पुरस्कार देण्यासाठी तसेच अशा मान्यवर व्यक्तीची निवड करण्यासाठी या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ठ "अ" मधील नियमांना व परिशिष्ठ "ब" नुसार पुरस्कार रकमेसह पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यास येणा-या एकूण रु. १, ५२, ८०१ [रु. अेक लाख बावन हजार आठशे अेक फक्त] खर्चास शासन मान्यता देत आहे. सदर पुरस्कार प्रतीवर्षी प्रदान करण्यात येईल.

२. यासाठी, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यास संबंधीच्या देयकांवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यांत येत आहे. तसेच पुरस्कार निवड समितीने निवड केलेल्या व्यक्तीस पुरस्कार प्रदान करण्याच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना देण्यात येत आहेत.

...२/...

श्री आर जी जगताप
का.अ.

३. यासाठी परिशिष्ठ "ब" नुसार येणारा खर्च "२२०५-कला व संस्कृती-१०२-कला व संस्कृती यांचे प्रचालन [तीन] चित्रपट [१] महाराष्ट्र चित्रपट महोत्सव [२२०५०७३४]-२० इतर खर्च मागणी क्र. एन-४" या लेखाशिर्षाखाली त्या त्या वर्षात करण्यात येणा-या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ६३४/९३/व्यय-११, दि. १५.१०.९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

[ म. मो. कांबळे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई [लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता]
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग, व्यय-११, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती.

जेएस. २६१०१९९३.

परिशिष्ट "अ"

शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक: मविम-१०९३/१५१११/प्र. १५९/सांका-१, दि. २८-१०-९३ चे सहपत्र.
मराठी चित्रपट क्षेत्रामध्ये आयुष्यभर, प्रदीर्घकाळ व उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवर व्यक्तीस कै. व्ही. शांताराम पुरस्कार देण्याच्या योजनेचे नियम.

---

१] संक्षिप्त शिर्षक आणि व्याप्ती : महाराष्ट्रातील मराठी चित्रपट क्षेत्रात आयुष्यभर, प्रदीर्घकाळ व उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तीस द्यावयाच्या पुरस्कारासंबंधीच्या या नियमांना "कै. व्ही. शांताराम पुरस्कार नियम", असे संबोधण्यांत यावे.

२] उद्दिष्ट : मराठी चित्रपट क्षेत्रात आयुष्यभर, प्रदीर्घकाळ व उल्लेखनीय कार्य केलेल्या कलाकारांस "कै. व्ही. शांताराम पुरस्कार" देऊन गौरव करणे आणि त्याद्वारे मराठी चित्रपट क्षेत्राच्या विकासाला उत्तेजन देणे हो या पुरस्काराची उद्दिष्टे आहेत.

राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कारांची संख्या कमी असल्यामुळे, महाराष्ट्रातील इतर अनेक कलावंतांची पात्रता असूनही राष्ट्रीय पुरस्कारापासून वंचित रहावे लागले. त्यामुळे अशा कलाकारांचा सदर पुरस्कारासाठी विचार करण्यांत येईल.

३] पुरस्काराचे स्वरूप : पुरस्कारात खालील गोष्टींचा समावेश असेल.
अ] रु. १,००,०००/- रोख.
ब] शाल व श्रीफळ
क] स्मृती चिन्ह

B ||

४] पुरस्काराचे क्षेत्र : मराठी चित्रपट क्षेत्रातील फक्त एका व्यक्तीची दरवर्षी पुरस्कारासाठी निवड करण्यांत येईल.

५] पुरस्कारासाठी पात्रता/ निकष. १] मराठी चित्रपट क्षेत्रांत एकनिष्ठेने, चिकाटीने आयुष्यभर, प्रदिर्घकाळ उल्लेखनीय कार्य करुन ज्यांनी चित्रपट कलेच्या कोणत्याही विशिष्ट शाखेत सर्वमान्य अशी

......२/-

मोलाची भर घातली आहे, असा मान्यवर, ज्येष्ठ व राज्याला गौरव प्राप्त करून देणारी कलाकार/व्यक्ती पुरस्कारासाठी पात्र असतील.

२] असा कलाकार आयुष्यभर कार्यरत असणारा असावा.

३] कलाकाराची त्याच्या कलाक्षेत्रातील कर्तृत्वाची ज्येष्ठता सिध्द असावी.

४] पुरुष कलाकार ६५ वर्षे, स्त्री कलाकार ५५ वर्षे यापेक्षा कमी वयाचा नसावा.

५] कलाकार महाराष्ट्र राज्यातील किमान २५ वर्षे रहिवासी असला पाहिजे. इतर प्रांतीय असल्यास, महाराष्ट्रात स्थायिक होऊन एकनिष्ठेने मराठी चित्रपट कलेची सेवा केली आहे, अशांचाच विचार केला जाईल.

६] कोणत्याही व्यक्तीस त्याच्या आयुष्यात एकापेक्षा अधिक वेळा ह्या पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

७] हा पुरस्कार मिळण्यासाठी जात, धर्म, लिंग ह्या गोष्टींचा विचार केला जाणार नाही.

८] एखाद्या कलेसाठी शासनाकडून पूर्वी पुरस्कार प्राप्त झाला असल्यास, अशी व्यक्ती पुरस्कारासाठी पात्र असणार नाही.

६] निवड समिती : मराठी चित्रपट क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची कै. व्ही. शांताराम पुरस्कारासाठी निवड करण्यासाठी निवड समिती नेमण्यात येईल. सदर निवड समिती दोन प्रकारची असेल.

... ३

एम२७१०९३

१] पहिली निवड समिती ही सात अशासकीय सदस्यांची असेल व त्यांच्यापैकी जेष्ठ व्यक्तीस त्या समितीचा अध्यक्ष नियुक्त करण्यात येईल.

२] निर्णय समिती ही खालीलप्रमाणे नेमण्यात येईल.

१] मा. मंत्री[सांस्कृतिक कार्य] - अध्यक्ष.

२] मा. राज्यमंत्री[सांस्कृतिक कार्य]--उपाध्यक्ष.

३] सचिव[सांस्कृतिक कार्य] - सदस्य.

४] संचालक[सांस्कृतिक कार्य] --सदस्य सचिव.

[मराठी चित्रपट क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींतून अशासकीय सदस्यांची पहिल्या निवड समितीवर सदस्य/अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्याचे अधिकार मा. मंत्री[सांस्कृतिक कार्य] यांचे राहतील.

७] नावाची शिफारस करण्याची पध्दत.

अ] कलाकारांची निवड मराठी चित्रपट क्षेत्रातील मान्यवर संघटना/संस्था यांच्याकडून शिफारस करण्यात आलेल्या नावातून सर्वसाधारणपणे करण्यात येईल. तथापि, संस्था/संघटनांनी शिफारस केलेल्या कलाकारासच पुरस्कारासाठी निवडले गेले पाहिजे, असे बंधन निवड समितीवर राहणार नाही.

ब] या संस्था/संघटना प्रत्येक चित्रपट क्षेत्रातील फक्त एका मान्यवर व्यक्तीच्या नावाची शिफारस करतील व त्या व्यक्तीच्या मराठी चित्रपट क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल तपशीलवार माहिती देऊन, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे अधिकृतरित्या शिफारस करतील.

क] शिफारशीबरोबर कलाकारांचे/व्यक्तींचे पारपत्र आकारातील छायाचित्र [३प्रतीत] पाठविण्यात ये यावे.

ड] या संस्था/संघटनांनी संबंधित क्षेत्रातील

एकापेक्षा अधिक व्यक्तींची पुरस्कारासाठी शिफारस करु नये.

इ] संस्था/संघटनांनी आपली शिफारस "गोपनीय" असे लिहिलेल्या मोहोरबंद पोकीटात घालून संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी विहित केलेल्या तारखेपूर्वी त्यांच्या कार्यालयात पाठवावी.

फ] संचालक, सांस्कृतिक कार्य हे मान्यवर संस्था/संघटना यांच्याशी प्रथमत: पत्रव्यवहार करतील.

ह] कोणत्याही संस्था/संघटनांकडून शिफारस न आल्यास संचालक, सांस्कृतिक कार्य हे स्वत:च पात्र व्यक्तींची नांवे पुरस्कारासाठी समितीकडे शिफारस करतील.

ज] कोणतेही कारण न देता शिफारस फेटाळण्याचा अधिकार शासनास राहील.

ल] पुरस्कारासाठी व्यक्तींची निवड करण्यापूर्वी मराठी चित्रपट क्षेत्रातील मान्यवर संस्था/संघटनांना संचालक, सांस्कृतिक कार्य पत्र पाठवून व्यक्तींची नांवे मागवतील.

८] आलेल्या शिफारशींची तपासणी.

अ] संस्था व संघटनांकडून शिफारस करुन आलेल्या नावांची तपासणी करुन संचालक, सांस्कृतिक कार्य हे हे नियमानुसार व्यक्तींची यादी तयार करुन शासन नियुक्त अशासकीय सदस्यांच्या निवड समितीपुढे ठेवतील. संस्था/संघटनांकडून आलेल्या सर्व शिफारशी निवड समिती समोर सादर करणे संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेवर बंधनकारक राहील. सदर निवड समिती मराठी चित्रपट क्षेत्रातील एका व्यक्तीची सांस्कृतिक राज्य पुरस्कारासाठी शिफारस करील.

ब] अशासकीय सदस्यांच्या निवड समितीने सांस्कृतिक ~~करव~~ राज्य पुरस्कारासाठी शिफारस

केलेल्या व्यक्तींच्या नांवास मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे अध्यक्षतेखाली नेमलेली निर्णय समिती अंतिम मान्यता देईल.

क] कोणत्याही वर्षी पुरस्कार पात्र व्यक्ती उपलब्ध आहे किंवा नाही याबद्दलचा अंतिम निर्णय पुरस्कार समितीच्या सल्ल्याने शासनाचा राहील.

९] पुरस्कार जाहीर करणारे प्राधिकार : अ] सांस्कृतिक राज्य पुरस्कारासाठी निवड समित्यांची शिफारस महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविण्यांत येईल व त्यात शासनाने मान्यता दिल्यानंतर पुरस्कार जाहीर करण्यांत येईल.

ब] शासनाचा निर्णय अंतिम असेल व शासनाच्या अशा निर्णयाविरुध्द कोणतेही अपील करण्याचा कोणालाही अधिकार असणार नाही.

क] शासनास एखाद्या व्यक्तिस देण्यात आलेला पुरस्कार योग्य कारण दर्शवून रद्द करता येईल आणि तसे घडल्यास तो पुरस्कार मिळालेली व्यक्ति सदर पुरस्कार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना परत करील.

१०] पुरस्काराचे वितरण : सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सव पारितोषिक वितरण समारंभाच्यावेळी देण्यांत येईल.

....